# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 30/10/2023 (सोमवार) सकाळ


---

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. रामटेक** :– दिनांक ०९/०४/२०१८ चे १६.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– कैलाश माणिकराव ठाकरे, वय ४४ वर्ष, रा. नवरगाव रामटेक यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे अप. क्र. २५१/२०१८ कलम ३०२ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील आरोपी नामे– महेश रूपचंद खंडाते, वय ३२ वर्ष, रा. जुमेश येला जि. शिवनी (मध्यप्रदेश) ह. मु. टुरीस्ट ढाबा जवळ नगरधन रामटेक व मृतक नामे– सौ. पुष्पा महेश खंडाते, वय ३० वर्ष, रा. नवरगाव रामटेक हे पती–पत्नी असुन फिर्यादी नामे– कैलाश मानिकराव ठाकरे, वय ४४ वर्ष, रा. नवरगाव रामटेक यांच्या शेतात गाई–म्हशी पाहण्याचे काम करीत होते व शेतातील झोपडीत राहत होते. आरोपी हा दारु पिण्याच्या सवयीचा असुन नेहमी मृतक पत्नी हिच्या सोबत झगडा–भांडण करीत होता. यातील आरोपी हा दारु पिवुन शेतात राहत असलेल्या झोपडीत आला व मृतक पत्नी हिच्या सोबत घरगुती कारणावरुन झगडा भांडण करुन आरोपीने मृतक हिच्या गळयावर धारदार शस्त्राने वार करुन जिवानीशी ठार केले.

सदर प्रकरणाचे तपास सहायक पोलीस निरीक्षक वर्षा मते मॅडम यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. जिल्हा सत्र न्यायालय कोर्ट क्र. १० श्री. देशमुख सा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक ३०/१०/२०२३ रोजी मा. जिल्हा सत्र न्यायालय कोर्ट क्र. १० श्री. देशमुख सा. नागपूर यांनी वरील नमुद आरोपीस कलम ३०२ भादंवि मध्ये आजन्म कारावास व ५०००/–रू. दंड दंड न भरल्यास ०१ महिना साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी जिकार सा. यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोलीस हवालदार रोहीत मांडवगडे यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर